म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५४३



REFBK-0025006
REFBK-0025006

# चित्रांगण

राजा मंगळवेढेकर

# चित्रांगण

राजा मंगळवेढेकर

REFBK-0025006
REFBK-0025006

अतुल प्रकाशन

चित्रांगण : कवितासंग्रह / राजा मंगळवेढेकर © राजा मंगळवेढेकर
प्रथमावृत्ती : वर्षप्रतिपदा १० एप्रिल १९८६. मुखपृष्ठ : अनंत सालकर
मुद्रक : सौ. कमल रामचंद्र घळसासी, संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव पेठ, पंतांचा गोट, पुणे ४११ ०३०.
प्रकाशिका : सौ. सुमित्रा गजानन क्षीरसागर, अतुल प्रकाशन
१४९३ क, सदाशिव पेठ, पेरुगेट रस्ता, पुणे ४११ ०३०

मूल्य तीस रुपये

चि. दिलीप
आणि दुर्गा
यांना

– दादा

संग्रहालय ठाणे
25483
काव्य-ग्रंथसंग्रह

अनुक्रम


चित्रांगण / ९
झाड / १०
अशा सर्वस्वाला / ११
दोन शब्दांच्याच साठी / १२
स्नेह / १२
चंद्र / १३
फितूर / १३
म्हणून म्हणतो / १४
उणी-दुणी / १४
ऋतूंचा ऋतू मी / १५
एक फक्त / १६
वसुंधरेचे गाणे / १७
पीस / १८
क्षितिज-मोर! / १८
चिठ्ठी / १९
आगळिक / २१
या वसन्तवेळी / २२
माझ्या मनाच्या मळयात / २३
कशासाठी कोणी / २४
ओळखीच्या खुणा / २५
आता उरलो ना- / २६
घर / २७
भविष्य-उदरी / २८
तिठ्यातिठ्यांवरी / २९
ऐसे झाले तरी / ३०
कासया करावी / ३१
सामर्थ्य सगळे / ३२
इशारा / ३३
मी / ३५
घरटे / ३६
सूर / ३७
आणि अमाप आभाळ / ३८
इथे तिथे रेंगाळता / ३९
भिंत / ४०
कावळा / ४१
एकदा म्हणे / ४२

तत्त्वज्ञानी / ४३
अर्धामुर्धा / ४४
पुढच्या क्षणास माझ्या / ४५
सोसण्यास नाही आता / ४६
पक्षी कसा सुखाने- / ४६
आला पिसाट वारा / ४७
येतील कधीतरी पक्षी / ४७
मागून काय घेऊ / ४८
माझ्या मी दुःखाला / ४८
गर्दी / ४९
रुजुवात / ५०
मूग घ्या मूग ! / ५१
ते पहा हो / ५३
एक ( प्रांजल )
म्हातारा म्हणाला- / ५४
आमचा जाहिरनामा / ५६
तरुण मित्रांनो, क्षमा करा / ५८
तरुणाईची कैफियत / ६१
लोकशाही अभंग पंचक / ६३
बरे झाले देवा ! / ६६
'त्या' गांधीने घोटाळा केला / ६७
समाज पुरुषा / ६९
या देशाला आता / ७०
देवाची काठी / ७२
एक माणूस / ७३
बाबा आमटे / ८०
चल वाट / ८१
कृतज्ञ / ८२
अगा, ऐकले कीर्तन / ८३
खार / ८४
घर / ८५
फूल उन्हाचे / ८६
वर्षा-गीते / ८७
स्वगते / ८९

## चित्रांगण

पाण्याला सुचते गाणे
लाटांच्या घेते ताना
आभाळही वरचे खाली
वेळावित येते माना

स्नेहाळ सभोती झाडी
झुरमुरता हळवा काठ
भरभक्कम राकट दगडी
तल्लीन परंतु घाट

ओलेते चित्रांगण हे
धुंदीत स्वतःच्या झरते
बुडबुडु वाजवुन टाळी
भाग्याची कळशी भरते !

## झाड

झाड असते मनमोकळे, ऐसपैस छंदीफंदी
झाड असते मौनीदेखील चिडीचिप् फांदी फांदी
झाड असते सडे फटिंग, मुक्त योगी कलंदर
झाड असते घरंदाज मुले बाळे खांद्यावर
झाड असते घमेंडखोर, भारलेले महत्त्वाकांक्षी
झाड असते ठेंगणे ठुसके सोज्वळ नि सर्वसाक्षी
झाड असते झपाटलेले गूढ गूढ भासणारे
झाड असते उधाणलेले खूप खूप हसणारे
झाड असते तुसडे आणि एकटे एकटे वागणारे
झाड असते वाकडे पण चारचौघात बसणारे
झाड असते तऱ्हेवाईक आपल्यातच रंगणारे
झाड असते लाडिकदेखील दुसऱ्यांना रंगवणारे
झाड असते असे पुष्कळ – माणसासारखे वाटणारे
झाड असते झाडच् केवळ, दुसरे काहीच नसणारे !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४३
काव्य २५००६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## अशा सर्वस्वाला

मला ठावे जळावाणी
सदा वाहणे वाहणे
तुला कसे जमताती
असे सर्रास बहाणे ?

झेपावण्या गगनात
पंख माझे उतावीळ
संथ तुझे सारे काही
तुझा वेगळाच पीळ !

उडी घेतानाही जळी
मीच मला अनावर
अशा सर्वस्वाला, तुझ्या
घाल बाहूंचा आवर !

## दोन शब्दांच्याचसाठी

एक गहिरा नजरपक्षी माझिया व्योमी उडे
मी तयाच्या वलयनक्षी गीतगर्भी सापडे

ह्या तमाच्या क्रूर वक्षी सहज रुळते चांदणे
गूढ चेटूक हे खरे, पण रूप-गंधित हो जिणे

तापल्या वाळूस पान्हा अमृताचा हा फुटे
सावलीशी किरणमृग हा धाउनी घेई झटे

गात बसले झाड, राघू घेउनी खांद्यावरी
मीही बनलो झाड, गेलो हिर्वळूनी अंतरी

अन् अता गे, गहन भारी मौन मज ना साहवे
दोन शब्दांच्याचसाठी शेकडो ही आर्जवे !

## स्नेह

ओली सुकी हवा आणि बगळ्यांचा थवा
वेळूवनातुनी घुमे रानभैरी पावा

दूरातुनी सूर कसे वेढती या जिवा
देहावरी फुले कसा पिसाराही नवा

वाट घाट ठावी नाही जाऊ कसे गावा
नाते गोते काय सांगू तसा मीच नवा

टिंब टिंब लुकलुके झाडांवरी दिवा
अधांतरी लटकल्या स्नेह मिळे जिवा !

## चंद्र

चंद्र केशरी नभी रात्र कोरिते खुणा
अर्थ शर्थ होउनी शब्द शब्द हो उणा

झावळ्यांत ये दडून गूढ आर्त स्तब्धता
अंथरून रंगमोह डोह खोल स्निग्धता

अळिमिळी जरी तरी झुळुक एक लाजरी
मंद लाट ये पहाट शिवुन शिल्प कापरी

डहुळल्या दिशा दिशा चांदण्याही लोपल्या
फिकट रात वेचिते खुणा दवात सांडल्या

## फितूर

रात्र चांदणी असो नसो पण हवा तुझा सहवास
फुलला नाही जरी मोगरा फुलेल ग ऽ ऽ मधुमास

हवाहवासा वारा मंथर असो नसो गारवा
खुषीत येइल पिसे फुलारुन वळचणिचा पारवा

घुमेल घुमु दे सुस्वर अलगुज कोठेतरी दूरात
लय भरलेले फुटेल हासू ओठांच्या मखरात

येवो जावो आकाशावर एखादा पक्षी
भिरभिरेल पण भाळावरती कुरळी काळी नक्षी

बोल हवी तर नको बोलू तू, मिजास ग ऽ सांभाळ
फितूर होतील डोळे, सावध! मुळचे ते ओढाळ!

## म्हणून म्हणतो

थांब जराशी जाण्यापूर्वी बोल टाकुनी पुन्हा
थरथरणाऱ्या नाककळीला शोभून दिसतो फणा

आदळआपट अन् दडदडेलही निमुट बिचारा जिना
अपशब्दांसह दिसेल म्हणतो, फणकारा देखणा

कधी मधी हा याचा इतुका आवडता पाहुणा
खट्याळ, तरीही उरला सुरला अडसर करतो उणा

अशाच वेळी गालांवरती सापडती मज खुणा
वीज सळसळे अंगांगातुन बनतो नकळत जुना

हीच तऱ्हा नी हीच लकब तव स्मरतो चंचळपणा
हट्टीपण हे कधि न पाहिले कोठेही तुजविना

म्हणून म्हणतो जाण्यापूर्वी बोल टाकुनी पुन्हा
घडेल, घडू दे माझ्या हातुन घडण्याजोगा गुन्हा !

## उणी–दुणी

उणी–दुणी काढू नकोस सरते पुरते करून घे
आगे मागे ठेवू नकोस अधांतरीही झेलुन घे !

वळुन वाकडे पाहू नकोस झाले गेले विसरून जा
अडेल अढी ठेवू नकोस अबोल्याची पुरे सजा !

चैत्र गात्री फुलला आहे मनचे मोर घालती केका
मुका मार साहू किती त्वचे–त्वचेत भिनल्या हाका !

## ऋतूंचा ऋतू मी

असा मी कसा मुक्त बेभान वारा
दिशाहीन नौकेपरी वाहतो
धुवांधार धारेत त्या रौद्ररूपी
क्षमेच्यापरी मी कधी नाहतो !

मला ना उन्हाच्या झळा झोंबताती
कळा गारठ्याच्या सदा सेवितो
भरती नी सुकती, मला काय त्याचे
सुरंगी क्षितीजास मी भोगितो !

दिसा-रात्रिला मी निळ्या या नभाची
उटी माखुनी चांदणे प्राशितो
ऋतूंचा ऋतू मी, तरी चक्र रोधी
तुझ्या कुंतलींची फुले हुंगतो !

## एक फक्त

किती घेऊ किती देऊ
अशा उत्फुल्ल क्षणाला
नको मोजू नको मापू
अशा गाफीलपणाला !

नको धरू नको स्मरू
कधी कुठल्या स्मृतीला
नको वेचू नको खेचू
कानामात्रेच्या शब्दाला !

नको रेखू नको माखू
इंद्र चंद्र चांदण्याला
नको नको आठवूस
रंगीबिरंगी गाण्याला !

एक फक्त—फक्त एक
आपणच आपुल्याला
देऊ—घेऊ आणि होऊ
धन्य गाफील क्षणाला !

## वसुंधरेचे गाणे

वैशाखाचा मैत्र चैत्र मज घेतो ग भुलवुन
ज्येष्ठ श्रेष्ठ हा गंभीरता मज जातो ग शिकवुन !

संध्यारंजित आषाढाचे मिळता संजीवन
रिमझिम श्रावण करतो उधळण जातो ग भिजवुन

फुलाफुलांचे भाद्रपदाने वसन दिले धाडुन
आश्विन सुफलित पुलकित करतो, देतो आश्वासन !

कार्तिक आरती गातच येतो झांजरताच उठून
मार्गशीर्ष तर शीर्ष शोभतो मासांच्या मधुन !

पौष पुरवितो शौक आणखी काटा रंध्रांतुन
माघ दावितो माग तळीच्या पिकल्या पर्णांतुन !

अल्गुज घुमवित वसंत वारा ये घेउन फाल्गुन
ऋतूमती मी वसुंधरा मज नवतीचे भूषण !

एक पांढरे शुभ्र मुलायम
पीस घेउनी हलक्या हाती
असताना तू लिहीत काही
फिरवावे तव मानेवरती

तंद्रीतुन तू तुझ्या शहारून
बोलावे मज काहीबाही
राग तुझा अन् तसले केवळ
ऐकायाचे पिसे मलाहि !

## क्षितिज-मोर !

किती खुडावे तिन्हिसांजेला
क्षितिजावरचे गेंद केशरी
खुडता खुडता मनमोराला
फुटे पिसारा गर्दभर्जरी !

मोर कसा पण, शत डोळ्यांचा
केशर- केशरमळे फुलवितो
कसे कुणाला ठाउक, बनुनी
क्षितिज-मोर मी नाचु लागतो !

## चिठ्ठी

काय लिव्हावा मायना......
येडी अडाणी लक्षुमी
असूं, संबाळुनी घ्यावी...
धनी, समजुनी तुम्ही

तुम्ही गेला आघाडीला
उलटले दीस मास
सय हुती घडोघडी
घर बुच्चं बुच्चं भासं

चार अक्षरं लिव्हते
घराकडची तुम्हाला
मन हुईल हलकं
बळ यील लढण्याला...

रांगू लागलाय राजा
त्याला पुरंना हो सोपा
खुशालीच्या चिट्टीसाठी
किती घाळू दारी खेपा

तुम्ही लावलेला आंबा
औंदा आहे मोहोरला
त्याचा दरवळ...वाटे,
तुम्ही आंगणांत आला !

गेल्या सणाला केलीती
पोळी-गुळवणी गोड
'सांजपत्तुर येत्याल'...
खुळं मनाचं हे येड

तुम्ही यावं, खावं गोड
असं जरी वाटं बाई
तरी लढाईची कामं
मला कळत का नाही ?

झाला उशीर...होऊं द्या
यावं यश मिळवून
साप ठेचा हिमतीनं
मीठ-म्हौऱ्या उतरीन

नको घराची काळजी
करा देशाची राखण
तुम्ही आघाडीला गेला
आम्हां इकडं भूषण !

## आगळिक

करून सवरून अशी आगळिक
मला मोकळिक दिलीस का ?
हातात घेऊन हात निघालिस
मधेच मग ग ऽ फिरलीस का ?

नजरेलागी नजर भेटता
ओठ दुमडुनि हसलीस का ?
रतिरंगाच्या चित्तविड्यावर
लवंग होऊन ठसलिस का ?

वळणावरती वळून जाता
पुन्हा जराशी झुकलिस का ?
जाता जाता वाटेवरती
खुणा पटवुनि गेलिस का ?

अडेल ओढा चढेल काही
हरवुनी तूही चुकलिस का ?
ढळता ढळता सावरला तरि
तोल जाऊनि फितलिस का ?

जमू नये ती जमली नाही
अशी सफाई केलिस का ?
घडू नये ते घडल्यावरति
पुन्हा निराळी झालिस का ?

## या वसन्तवेळी

या वसन्तवेळी वाऱ्यालाही कळते
पाऊल नाचरे घराकडे गे वळते
ही हिरमुसलेली दिसादिसांनी तेव्हा
उरि उतावीळशी मोगरी होऊनि फुलते !
या वसन्तवेळी गगनालाही स्मरते
होऊन लाजरे गुणगुणत काहिसे बसते
मग अनासक्तशी दिसादिसांनी जेव्हा
मंत्रीत मृत्तिका रंगांची उधळण करते
या वसन्तवेळी रानमनी गुज झुलते
हरवून भान पंखांत वीज सळसळते
तर मिटुन घेतल्या दिसादिसांनी तेव्हा
झेपेत क्षितिजही जरतारी झगमगते !
या वसन्तवेळी तू–मी मुळि न उरावे
अस्तित्व आपले वासंतिक गे व्हावे !

## माझ्या मनाच्या मळ्यात

वाट पाहुनी पाहुनी
दीठ बनली आंधळी
थेंब डोळ्यात आटले
सर आत कोसळली

अंतरात आला पूर
पाणी पाणी चहूकडे
माती होई ममताळू
विरघळे खडे खडे

ममताळू मातीमाजी
नांगरून पेरा केला
माझ्या मनाच्या मळ्यात
विठू विठू अंकुरला !

कशासाठी कोणी

कल्लोळले सूर
अमृताचा पूर
मनाचे नुपूर
झंकारती

बुडालो तालात
नाचलो ठेक्यात
नुरलो भानात
अवचित

अवचित असा
आनंदाचा पसा
उधळिला कसा
कोण जाणे

कशासाठी कोणी
चुकविले देणे
फेडिले पारणे
हातोहाती !

## ओळखीच्या खुणा

ओळखीच्या खुणा
बोलाविती पुन्हा
सुगंध ये उन्हा    माहेराच्या

कल्लोळले मन
रोमांचले तन
उंबरा घे तान    माहेराचा

माहेरले भाव
मोहोरला जीव
विसाव्याला धाव  माय–बाप

मायबाप आता
पैलतीरावरी
पिले खांद्यावरी    ऐलतीरी

ऐलतिरी आता
माहेर मांडले
अंकुर भिडले    मांडवाशी

मांडव पेलण्या
खांब मायबाप
झालो आपोआप  मोहरून

२

आता उरलो ना–

डोळियांनी दोन्ही
प्यायलो आभाळ
अहंतेचा गाळ   विराटला

विराटले भान
जग झाले थिटे
माझेपण मिटे   माझ्यातच

आता उरलो ना
मला मी परका
क्षितिजासारखा   नभावलो

## घर

एकदा समोर
माझ्या आले घर
उघडून दार    आत नेले !

घराचे कोपरे
हसले की छान
छपराची तान    कानी आली !

पायरीची मान
झाली थोडी ताठ
जमिनीचा थाट  और होता !

खिडकीचे गज
कवितेत दंग
भिंतीचा सुरंग    आत्मलक्षी !

माझे घर...घर...
म्हणत मी आलो
आज उमगलो    घरपण !

## भविष्य–उदरी

प्रज्ञेने मांडिले । प्रकाश पुराण ।
पंडित गहाण । दक्षिणेला ॥

अर्थ पाणी झाले । शब्द पखालीत ।
दोंद खुशालीत । वाढतसे ॥

कीर्तनाच्या रंगी । साळूवरी डोळा ।
बुवा भाव भोळा । दावीतसे ॥

तत्त्व, मूल्य, नीती । चर्चा रोखठोक ।
निष्ठेलागी भोक । पडलेले ॥

पतितपावन । कैवारली वाणी ।
विवेकाची गोणी । माळ्यावरी ॥

भविष्य उदरी । अंधाराची वस्ती ।
संत आजि सस्ती । सवंगला ॥

## तिठ्यातिठ्यांवरी

तिठ्यातिठयांवरी । कुत्री केकाटती ।
भुंकभुंकताती । एकमेकां ॥

तिठयातिठयांवरी । कावळे कोकती ।
कावकावताती । एकमेकां ॥

तिठयातिठयांवरी । गर्दभ झाडती ।
लत्ता लत्ता देती । एकमेकां ॥

तिठयातिठयांवरी । खुळी जमताती ।
वाकुल्या दावती । एकमेकां ॥

तिठयातिठयांवरी । वक्ते बोलताती ।
शिव्या शिव्या देती । एकमेकां ॥

तिठयातिठयांवरी । ऐशीच संस्कृती ।
एशीच प्रकृती । तिठयाचीच ॥

## ऐसे झाले तरी

कान, डोळे आणि मन
खुले ठेवूनिया ध्यान
ग्रंथ सृष्टिचा हा शिका
त्याने वाढतील भुका

भुका वाढता वाढल्या
दाही दिशाही व्यापल्या
झाले गगन ठेंगणे
खुली पाताळ अंगणे

होई प्रकाशी प्रकाश
फुटे आकाशी आकाश
ऐसे काही आले हाती
बोल्ह लागलीसे माती

हवे तसे धावे जळ
नाचे बोटावरी कळ
कळ महिमा विज्ञान
आज झाले ब्रह्मज्ञान

चक्रापाठी चक्र फिरे
गती गतीमध्ये विरे
केली विज्ञाने करणी
जोडी गगन–धरणी

ऐसे झाले तरी बापा
जपा माणसाच्या रोपा !

## कासया करावी

कासया करावी
आजची मी खंत
कालचीही भिंत    भंगलेली

भंगलेली भिंत
खुशाल भंगू द्या
विशाल पाहू द्या    स्वप्नसृष्टी

खुशाल नागवा
हिणवाही चक्क
मात्र राहो हक्क    स्वप्नांवरी

माझी स्वप्ने माझ्या
राहू द्या उराशी
बांधीन उद्याशी    प्रेमगाठ

## सामर्थ्य सगळे

तिठ्यातिठ्यावरी
व्यवहारी भाषा
घोंघावती माशा   दक्षचित्त

मोजता रकमा
टक्कलास घाम
वाढे परि दाम   शून्यालागी

आपुल्या बळाने
जातो सुखे काळ
तुळशीची माळ   वृद्धपणी

किडामुंगीसाठी
थोडीशी साखर
भिक्षेस चतकोर   असो द्यावी

सामर्थ्य सगळे
हिशेबात आहे
खातेवही पाहे   साक्षात्कारी.

इशारा

१

झुगारुनी वीट
झाडोनीया अंगा
आता पांडुरंगा   हात सोडी

हात सोडोनीया
कटीचे, उभारा
सोडोनी गाभारा   वाळवंटी

वाळवंटी देवा
वैष्णवांचा मेळा
पुन्हा करा गोळा   तातडीने

असूनी चोखोबा
पारखा पाण्याला
तसाच घाण्याला   जुंपलेला

हीच दैना भाळी
युगे अठ्ठावीस
व्हात्रे कासावीस   जरा तरी

ना तरी होईल
चोखा–भाव डोंगा
बदलेल रंगा   अंतर्बाह्य

२

जनी आहे जनी
होती तशी दासी
व्यथित मानसी   हतभागी

कांडते रांधते
वाढते नी वीते
टाकलेली शीते   गिळूनीया

एके दिनी तीही
मारुनीया लाथ
दाखवील हात   दास्यत्वाला

आणि खरोखर
आगळेच स्रीत्व
आगळेच सत्त्व   प्रकटेल

तेव्हा जनी नोहे
कुणाचीच दासी
मुक्तीसाठी प्यासी   जनी आहे!

## मी

डोंगर होतो बाप आणखी
  नदी बनतसे आई
अजोळ झाले आभाळ वरती
  खालती आजी हो भुई

इथे तिथे हे पसरून फांद्या
  चुलते मामे उभे
जाळ्या-वेली आत्या-मावश्या
  भाचे फुलांचे झुबे

चिवचिवणाऱ्या बहिणी गाती
  अंगण होते गाणे
ऊन-चांदणे खट्याळ भाऊ
  घालिती नित्य उखाणे

गजबजलेल्या अशा घरी या
  मी सगळ्यांचा सगळा
कधी कधी पण सगळ्याहुनिही
  मी माझा आगळा !

## घरटे

कोण कुणाचे सगेसोयरे
कसे भेटले कुठे
गहन तमाच्या फांदीवरती
उभे कसे घरटे !

दहा दिशा अन् बारा वाटा
छपराखाली इथे
दगड मातीहि मांगल्याचा
श्वास घेउनी उठे !

चौ-भिंतींना चौ-बाजूंनी
आम्रपालवी फुटे
खांब, पायऱ्या, तुळ्यांवरती
स्नेह स्निग्धशी पुटे !

औट हाताचे अंगण रिंगण
क्षितिज त्यातहि मिटे
इथे वाढल्या सृजनबाहूंना
गगनहि पडते थिटे !

## सूर

दूरातुनि धावत आले
हे थवे सुरांचे गोड
ना ओळख पाळख पहिली
जडलेच जिवाला वेड

वेडाचे सुंदर झाड
अष्टांगी मोहरुन गेले
हिमशुभ्र मंद गंधाचे
लक्षावधी फुलले झेले

या अशा सोहळ्यामध्ये
हरवून स्वतःला बसलो
गुणगुणता झेला होउन
आकाश-फांदिवर झुलतो !

## आणि अमाप आभाळ

मापू जाता पुरेचिना
थिटे पडतसे माप
असे विशाल तरीही
वाटे, आभाळच बाप !

उंच त्याच्या खांद्यावरी
मला बसायचे वेड
हट्ट घेऊन तयाशी
रुसायची नित्य खोड

अशा वेडात हट्टाने
हिंडताना लागे धाप
आणि अमाप आभाळ
घेई पापणीत झोप !

## इथे तिथे रेंगाळता

इथे तिथे रेंगाळता भान वेळेचे ना उरे
गोऱ्या दिवसाच्या शिरी आता सुकलेले तुरे

घट दिशांचे या दाही भरलेही काळोखाने
वाट खुंटलीसे पायी, तिचे थांबलेच जाणे

लख्ख प्रकाशाचे गाणे तेव्हा कानाआड केले
चक्क उघड्या डोळ्यांना व्यर्थ जागरण झाले

उमलत्या पाकळीचा कधी हुंगला ना श्वास
रोषणाईचा जडला झगमगता हव्यास

अशातच ठेपली ही दिवेलागणीची वेळ
इथे तिथे रेंगाळता अर्ध्यावरी राही खेळ !

## भिंत

खंगलीस वाहुनीया
सात पिढ्यांचा गे भार
चिरेबंदी काया तुझी
आता शोधते आधार !

दुपारच्या उन्हाला तू
आजवरी दिली पाठ
पावसाचा नाच शिरी
तुवा झेलिला निमूट !

आल्यागेल्यांची वर्दळ
तुला त्यांचा परिचय
सात पिढ्या गेल्या खऱ्या
तूच वारस– संचय !

आता परी दुभंगून
गेला आहे चिरा चिरा
तुझी क्षीण लोचनेही
लागलीत पैलतीरा !

तरी तुझ्या मनात गे
आहे वासना आंधळी
नित्य निरखीसी काय
पायी पिंपळाची मुळी !

## कावळा

मुद्रा कशी हवी तशी
    लोभसवाणी हरघडी
कपडे असेच ( लफडेबाज )
    पांढरे शुभ्र परीटघडी
बंगलादेखील ऐसपैस
    छोटीशीच बाग
पुष्कळ पुष्कळ हसणे
    नि माफकच राग
खाणे पिणे पथ्यकर
    बोलणे आखीव रेखीव
बसणे उठणे हितकर
    सगळेच कोरीव कातीव
कुठे म्हणून डाग नाही
    एवढासाही ठिपका नाही
पांढरेफेक कबूतर
    लख्ख पिंजऱ्यात बसून राही
शुभ्र रंग गोरे अंग
    गोऱ्या गोऱ्याशीच संग
गोरे घर, गोरी गच्ची
    गोरे अंगण आख्खे दंग
झकपक झकपक
    दुधाळ स्वागत आव-जाव
मनामधल्या ओसाडीत
    कावळा करतो काव काव !

## एकदा म्हणे

एकदा म्हणे काय झाले–
अस्से झाले तस्से झाले !

अस्से तस्से होता होता
कानी काहीबाही आले !

त्यात किती खरे खोटे
कान–डोळे चार बोटे !

पण म्हणे झाले काय–
अनीतीला नीती भेटे
नीतीचीच निरी फिटे !

अधर्माला धर्म भेटे
धर्माच्याच अंगी काटे !

अन्यायाला न्याय भेटे
न्यायाचीच कानात बोटे !

असत्याला सत्य भेटे
सत्याचेच तोंड मिटे !

असभ्याला सभ्य भेटे
सभ्याचीच बाही फाटे !

म्हणजे एकूण झालं काय ?
कमरेखाली आपलेच पाय !

## तत्त्वज्ञानी

कोणी एक तत्त्वज्ञानी
रात्री जाग जागला
विचार करता करता त्याचा
पहाटे डोळा लागला
कोणी एक तत्त्वज्ञानी
सभेत वाद करतो
विश्व, माया, सत्य, ब्रह्म
बायकोपुढे गिळतो
कोणी एक तत्त्वज्ञानी
पर्यटनास निघतो
उंबऱ्यामधेच धोतरात पाय
अडखळून पडतो
कोणी एक तत्त्वज्ञानी
धुंडीत बसला ग्रंथ
त्याचे त्यालाच कळले नाही
केव्हा घडला अंत !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा

## अर्धा मुर्धा

कधी कधी माझा मलाच राग येतो
अशा वेळी मीच मला धिक्कारीत बसतो

अशावेळी माझा मीच मुखवटा फाडून टाकतो
मूर्तिभंजक होतो मीच माझ्या ठिकऱ्या करतो

माझ्या हातातला हातोडा ज्या त्या वर चालतो
जे ते मिळवलेले, मिरवलेले मी धुळीस माखतो

ज्ञान, विद्या, कला, शौर्य– मीच मला हसतो
भ्याड, पापी, निर्बुद्ध, क्रूर– काहीच पुरता नसतो

असे तसे कसेही पहा, अर्धाच मी दिसतो
वर सोडाच, पण शापदेखील अर्धाच असतो

अर्ध्यामुर्ध्या मला जरी मीच जाळीत राहतो
अर्ध्यामुर्ध्या धैर्यानेच सारे सारे सोसतो !

## पुढच्या क्षणास माझ्या

पसरून पाय बसतो, साधून एक मोका
पुढच्या क्षणास माझ्या, मी पाहुणा अनोखा

ह्या ओंजळीत फक्त क्षण चालताच आहे
होताच पाठमोरा कसल्या न ठावे हाका

झुलते सुरेख फांदी वक्षावरी नभाच्या
लाटांवरी सुखाने डुलती मजेत नौका

मातीत सांडलेल्या अंकूरही बिजाला
घरट्यात जन्मलेल्या पंखास वेगरेखा

वारा बनून पारा जाईल दूर लांब
थारा कसा, कुठे तो, सगळ्या मनी कुशंका

हे दार ह्या क्षणाचे उघडे असे असेतो
भोगून तृप्त बनतो झटकीत ऊर्ध्व काखा !

## सोसण्यास नाही आता

सोसण्यास नाही आता अंत राहिलेला
सोसणेच सोशित झालो खंत सोबतीला !

जोखण्यास नाही संधी तेवढी मिळाली
तोलण्यास नाही काटा, उरी बिलगलेला !

जसे जसे जे जे आले पुढे चालताना
तसे तसे ते ते सगळे घेतले कुशीला !

पाय एक जाणून होते चढण चढायाची
हात फक्त जाणून होते आपण पोळण्याला !

कधी मधी गळले डोळे, नाही असे नाही
पुढे पुढे तेही झाले कोरडे सदाला !

## पक्षी कसा सुखाने–

पक्षी कसा सुखाने आभाळगोष्ट सांगे
आभाळ ऐकण्याला पंखांवरी तरंगे

पंखांवरील नक्षी लक्षी अनंत पाने
पानात गुंतलेली फांदीही त्यात गुंगे

फांदीवरील पक्षी विसरुनही स्वतःला
विसरून सर्व सगळे गोष्टीत फक्त रंगे

आभाळ, पक्षी, फांदी– हे चित्र होई झाड
धमन्यातुनी मुळींच्या मातीत गोष्ट हुंगे

पक्षी कसा सुखाने आभाळगोष्ट सांगे
आभाळ ऐकण्याला पंखांवरी तरंगे !

## आला पिसाट वारा

आला पिसाट वारा झोकून दे स्वतःला
वाऱ्यासवेच घे गे, आभाळ हे उशाला !
नवखीच तू आणि हे नवखेच गाव सारे
इथले ऋतु सभोती होतील रंग गोळा !
कळतील गूढ हेतू फुलतील गंधगाणी
स्पर्शातला अनोखा घे, पांघरून शेला !
स्वप्नात पाहिलेला नक्षत्रलोक सारा
येई तुझ्या हाताशी मंत्रीत चंद्रशाला !
वसतीस या अनोख्या प्रश्नोत्तरे कशाला ?
लय गुंफुनी इथे ती हरवून जा स्वतःला !

## येतील कधी तरी पक्षी

संपताच गाणे पक्षी गाण्यातिल दूर उडाले
सोबतीस मंतरलेले स्वरपीस एकले उरले !
हलकेच लागता डोळा, हलकेच पीस भुरभुरते
हळुहळू पापण्यांवरती पक्ष्यांचे गाणे झुलते !
कधी नव्हे अशी मग फिरते गाण्यातिल गगनातून !
पक्ष्यांना घेऊन वक्षी गगनातिल गगनातून !
संपता निमंत्रण असले माझी मी उरते, स्मरते
गाण्यातिल पक्ष्यांची त्या क्षितिजावर वाट पहाते !
येतील कधी तरी पक्षी, रंगेल पुन्हा हे गाणे
स्वरपीस तोवरी जपुनी पक्ष्यांची वाट पहाणे !

## मागून काय घेऊ

मागून काय घेऊ, देणार तूच दाता।
देता पुरेल का रे घेण्यास दोन हाता॥
जे जे दिलेस आधी ते ते कळो न यावे
त्या देणगीतुनी मी श्रीमंत धन्य व्हावे
आणि हिशेबअंती, राहोच नम्र माथा!
देशील तू अमाप, मोजू कसा परंतु
गणितास मानवाच्या साधेल काय हेतु
ध्यानात मर्म यावे, गीते तुझीच गाता!
घेण्यातली कमाई हा या जगास छंद
देण्यातला न ठावा तो मोकळा आनंद
देणार, दे तरी रे, असली कृपा अनंता!

## माझ्या मी दुःखाला

माझ्या मी दुःखाला झाकणार हृदयातच
त्यागिन मी कधि न तया घोट कटु गिळणारच।
घडिले मज ज्याने त्या दुःखाला विसरू कसा?
क्षणभरिच्या सुखसरीत त्याला मी स्मरणारच!
स्मरणातच मी कृतार्थ होईन त्या दुःखाच्या
सोबत मज दुःखाची सतत सतत मिळणारच!
मज श्रद्धा, फुलतिल या दुःखावर प्रीतफुले
अश्रू मग माझे त्या भिजणारही गंधातच!

## गर्दी

गर्दीतला नव्हे मी गर्दी जरी सभोती
गर्दीत गारदी या देतील मूठमाती

पडती गळ्यात हार गगनात घोष भिडतो
खैरात आरत्यांची मजलागी कोण पुसतो

सगेसोयरे नि स्नेही गर्दीस देती साथ
तरही फितूर यांना झालेच हातोहात

आरसा कसा म्हणावा विकले इमान त्याने
गर्दीतलेच खोटे टिपलेही बिंब याने

या चंद्र–चांदण्यांना नाहीच काय काही
या फूल–वेली यांना असलेच काही बाही

सगळे कसे मिळाले गर्दीस आपसूक
कोणीच जाणिली ना माझी तहानभूक

गर्दी हटेल मागे सद्दी सरेल जेव्हा
करतील गारदी मग हल्लाही क्रूर तेव्हा

कैफात या परंतु जागे सदा रहावे
गर्दीस मीच माझ्या वश ना कधीच व्हावे !

## रुजुवात

रुजुवात मीच करतो माझी मला स्वतःशी
सुरुवात मीच केली, बसतो मना उशाशी

तत्त्वज्ञ थोर मोठा असला आणून आव
माझ्यातल्याच केला चोरास मीच साव

नव्हते कधीच माझे, माझे म्हणून म्हणलो
होते आधीच माझे ओझे म्हणून कण्हलो

ठेवून चंद्र दूर प्रतिबिंब हृदयी धरले
सारून गंधसुमने घर अत्तरांनी भरले

वळवून पाठ सूर्या तिमिरास साथी झालो
विझवून वात मंद छंदात हीन न्हालो

दवडून ज्ञानपुरुषा उरुसात दंग फिरलो
सांडून सानमुद्रा खुर्दाच खुद्द बनलो

आता हिशेब करता काहीच ना जमेशी
सगळाच खर्च खाती रुजुवात ही स्वतःशी !

## मूग घ्या मूग !

मूग घ्या मूग !
मूग घ्या मूग ! !
काय म्हणता,
भाव काय ?
काय बाई,
कसले काय !
वाट्टेल तो द्या दाम
मूगाचेच आज काम
हवं तर फुकट घ्या
पण मूग घ्या मूग !
पलिकडच्या गल्लीतले ज्वलज्जहाल नेते
अलिकडच्या आळीतले महनीय प्रवक्ते
जवाहरलाल पथावरील पुरोगामी साहित्यकार
नव्या टिळक कॉलनीतले झुंजार पत्रकार
आगरकर वसाहतीतले जागृत विचारवंत
सांस्कृतिक नगरातले क्रांतिकारी कलावंत

किती तरी लोकश्री
किती तरी वीरश्री
किती तरी सूरश्री
एक-दोन म्हणू नका
किती तरी पद्मश्री...
शास्त्री, पंडित, तीर्थ, मीमांसक...
अध्यापक–प्राध्यापक
आचार्य–प्राचार्य
भूषण–विभूषण...

सगळ्यांनी बाईसाहेब,
मूग घेतले भरभर
किती किती झरझर !
भावाची चर्चा नाही
मापाची पर्वा नाही
घासाघीस...विचारपूस...
काही म्हणजे काही नाही !

खरोखर ! बाईसाहेब,
विद्वान–शहाण्यांचे कामच न्यारे
लगोलग जाणतात मतलबी वारे !

मूग घेतले पटपट
गिळून बसले झटपट !
मूग घ्या मूग !
मूग घ्या मूग ! !

## ते पहा हो

हे असे झाले कसे हो, हे असे होणार होते
प्रश्न नसतो दुर्बलांना, फक्त असती धूर्त नेते !
तेव्हा तसे ते बोलले, विसरून जा ते मागचे
तेव्हा आता ते बोलती, तेही केवळ आजचे !
आज ते जे बोलताती, ते उद्या असणार नाही
फक्त तुम्ही धरूनि चाला, पकडुनी त्यांचीच बाही !
मूर्ख आपण आजचे, मूल्य काही मानितो
सत्य आणि न्याय-नीती, आब त्यांची राखतो !
ते पहा हो, नेते कसे, आपुले वस्ताद भारी
दडपुनी खुश्शाल ते झुलविती शब्दांवरी !

एक ( प्रांजल ) म्हातारा म्हणाला—

जवान दोस्तांनो,
कसले विचारता मार्गदर्शन ?
शब्दकोशाची जाडी वाढवणाऱ्या
आणि भाषेला अकाली वृद्ध करणाऱ्या
या शब्दांपासून
सावध रहा !

आमच्या पांढऱ्या केसांना फसू नका.
त्यांचा हवा तेवढाच आब राखा
बाकी तुमचा रस्ता तुम्हीच आखा.
आम्ही पुष्कळ उन्हाळे पाहिले—
कबूल.
पण, खरं तर त्याचं श्रेय ऋतुचक्रालाच,
पुष्कळ वाटचाल केली—
पण म्हणून आम्हांला अचूक मार्ग
गवसला म्हणता काय ?
नो–नो–नो मित्रांनो,
भलताच गैरसमज करून घेऊ नका.
ते तुम्हाला परवडणारं नाही.

आमचं म्हणाल, तर आता गैरसमजाव्यतिरिक्त
दुसरं नंदनवन आम्हांला उपलब्धच नाही.
अरे, वठून गेलेल्या आम्हांजवळ
असून असणार काय?
तर पराभव आणि निराशा यांची एक प्रदीर्घ गाथा!

पण दोस्तांनो,
तुम्ही तरुण आहात.
तारुण्याला पराभव आणि निराशा ह्या वस्तू
अपरिचितच असतात.
अरे, प्रकाशाने कधी अंधार पाहिलेला आहे काय?

लोक काही म्हणोत,
ज्यांना आता मार्ग उरलेला नाही
आणि जे गतिहीन बनलेले आहेत
त्यांना मार्गदर्शन पुसण्याचा तुम्हांला
अधिकारच नाही!

आणि मित्रांनो,
एक लक्षात असू द्या :
ज्याचा मार्ग त्यानंच शोधायचा असतो.
'पुढच्यास ठेच, मागचा शहाणा;'
हे तितकंसं खरं नाही.
आणि असलंच तर चालत्याला उपयोगी नाही.
त्याच्यासाठी पुन्हा ठेच...पुन:पुन्हा ठेच...
हेच खरं मार्गदर्शन.
चरैवेति! चरैवेति!...

## आमचा जाहीरनामा

आम्ही समस्त लोक
आमचा जाहीरनामा प्रसिद्ध करीत आहोत !
नेते मंडळी हो,
आजवर तुम्ही आमच्यासाठी
फार फार केलेत–
फार फार सोसलेत–
म्हणून आभार मानलेच पाहिजेत तुमचे !
नेते मंडळी हो,
निवडणुकीचे पडघम झडू लागले
तुमचे दुर्मिळ दर्शन घडू लागले
लोकहिताच्या कळकळीचे शब्द
कानी पडू लागले
केवढे लोकनिष्ठ तुम्ही !
केवढे देशभक्त तुम्ही !
नेते मंडळी हो,
किती कष्ट घेता आम्हां लोकशाहीसाठी तुम्ही
तुम्ही आता, ( नको म्हटले तरी ) येणार
तुमचा जाहीरनामा ऐकवणार
आम्हा लोकांच्या कल्याणासाठी कष्टणार
अहाहा ! किती सेवारत तुम्ही !

पण नेते मंडळी हो,
आम्ही समस्त लोक आमचा जाहीरनामा
प्रसिद्ध करीत आहोत!—

नेते मंडळी हो,
आमच्यासाठी आता तुम्ही काही केले नाही
तरी चालेल
कारण, शिल्लक काय करायचे ठेवले आहे?

तरी पण या आमच्या जाहीरनाम्याने
आम्ही समस्त लोक
आपणाला एकच विनंती करीत आहोत.

नेते मंडळी हो,
आमचा हा देश शिल्लक ठेवा
आमच्या देशाची अब्रू शाबूत ठेवा
ती टांगू नका जगाच्या वेशीवर
आमचा देश गहाण टाकू नका
विकू नका—फुंकू नका—
तुमच्या आसुरी स्वप्नांसाठी
बस्.

नेते मंडळी हो,
आमचा देश आम्हाला राहू द्या
आमच्या नी तुमच्याही
मुलांबाळांसाठी सुखरूप असू द्या!

## तरुण मित्रांनो, क्षमा करा !

तरुण मित्रांनो, क्षमा करा !
आम्हीच– हो हो, आम्हीच
नासवला आहे देश तुमचा उद्याचा,
केवळ आमच्याच बापजाद्यांचा समजून

आम्हीच पोसली आहे
दांभिक, भ्रष्ट, तशीच नतद्रष्ट पिलावळ
कंत्राटी देशभक्तांची
किडक्या काळ्याकुट्ट संस्कृतीचे
आम्हीच आहोत निर्माते.

आम्हीच अर्थश्रीमंत शब्दांना खेचले रस्त्यावर
आणि चोथा करून टाकला त्यांचा,
त्यांच्यातल्या आशयासहित.
आम्हीच ते दुर्योधन
ज्यांनी निरी हिसकली नीतीची
भरसभेत चहाटळांच्या.
आम्हीच ते दिवाळखोर–
ज्यांनी लिलाव फुंकला मूल्यांचा

नाक्या-नाक्यावर नाटकी खत्रूडांच्या.
आम्हीच मतलबी
घेतले डोक्यावर सत्तांध समंधांना
आम्हीच काढल्या मिरवणुका
आणि भिडवला जयजयकार गगनाला
स्वार्थपिसाटांचा, वल्गनाखोरांचा...

आम्हीच ते बुभुक्षित भिक्षुक
लाचार लाळघोटेपणा करीत पसरले हात
किताबी पदव्यांसाठी.
आम्हीच-आम्हीच ते धृतराष्ट्र!
दुष्कृत्यांचे आंधळे साक्षी प्रोत्साहक.
आणि डोळ्यावर पट्टी बांधून पोरट्यांच्या
सैतानी चाळ्यांचे कौतुक करणारी गांधारीही
आमच्यापैकी-आमच्यातलीच.
तर किती उपसायचा आमच्या लंपट स्वार्थाचा
उकिरडा...आणि किती उगाळायचा
आमच्या कृष्णकृत्यांचा कोळसा...

कबूल आहे!- कबूल आहे मित्रांनो,
आमच्या वाडवडिलांनी झुंजून
देश स्वतंत्र करून दिला आमच्या हाती,
पण फुटक्या हाताची बदचलन अवलाद
निपजलो आम्ही त्यांच्या पोटी.
सोयीचे होते म्हणून त्यांची आरती गातगातच
स्वातंत्र्याचा गळा कापला आम्ही.

कबूल आहे ! कबूल आहे, मित्रांनो,
आम्हीच नासला आहे देश तुमचा उद्याचा,
म्हणून थुंकलात संताप-चिडीने सुरकुतलेल्या
थोबाडांवर आमच्या...
तर–तर निदान मी तरी
रागावणार नाही तुमच्यावर.

( पण एवढ्यासाठी तरी तरुण मित्रांनो,
संतापून उठा, चिडून पेटा ! )
तुमचा राग, संताप, चीड, क्षोभ–सर्व काही
मी समजतो, मित्रांनो !
कारण ओंगळतेची चीड येणे
हा उमलत्या तारुण्याचा धर्मच आहे !
ढोंगाची लक्तरे टरकावणे
हा फुलत्या जवानीचा स्वभावच आहे !

म्हणून तरुण मित्रांनो,
आपल्या स्वभावधर्माला जागा !
सर्वंकष घाण गाडून, जाळून
सत्य–सौंदर्याच्या फुलबागा फुलवणे
हा तारुण्याचा ध्यासच आहे.
या ध्यासासाठीच तुमचे श्वास असोत !
जाता जाता एवढेच मागेन की,
तरुण मित्रांनो, क्षमा करा !
( करायची असेल तर... )

## तरुणाईची कैफियत

आम्ही तर असे अभावग्रस्त
उभे आयुष्य संत्रस्त !

ना हाताला काम, ना खिशाला दाम
ना पायाखाली वाट, ना कणा अमुचा ताठ
माथ्यावर छप्पर नाही
उबेला कोपरा नाही
पोटभर अन्न नाही
अंगभर वस्त्र नाही
आमचे म्हणावे, असे काहीच नाही.

मग कसे म्हणावे–
खंगलेल्या छातीने राष्ट्रगीत ?
खोल डोळ्यांच्या निराश गर्तेत
कसा झुलावा अभिमानाने राष्ट्रध्वज ?
विझलेल्या अपमानित भावनेने
कसा साजरा करावा स्वातंत्र्यदिन ?

आमचा देश, आमचे राष्ट्र
किंबहुना आमचे जग–आहेच कुठे ?

आम्ही तर केवळ उरलो आहोत
यःकश्चित् फोलपटे

वेळी अवेळी मात्र ऐकत असतो
गजर–घोष आमच्या तारुण्याचा

तारुण्याचा, पराक्रमाचा
शौर्याचा, शर्थीचा...

पण काय उपयोग ह्या आरतीचा ?
कारण इथे पराक्रमासाठीही हवा आहे वशिला

शौर्यासाठी पाहिजे आहे लाच
शर्थीसाठी लाचारी...

इथे तारुण्यच बनले आहे असे भिकारी
हीन–दीन विकारी...

ज्या तारुण्याला का जगायचे–ठाऊक नाही
कसे जगायचे–माहीत नाही
आणि ज्याची गणना केवळ खानेसुमारीच्या
वेळीच होते
त्या तारुण्याला चेहेराच नसतो.

असे बिन चेहऱ्याचे आम्ही–अभावग्रस्त
उसे आयुष्य संत्रस्त !

## लोकशाही अभंग पंचक

॥ १ ॥

मतांची नोंदणी । पुढाऱ्यां पर्वणी
पहा हो करणी । लोकशाही ॥ १ ॥

रोख होती लोक । एरवी उधार ।
ऐसा हा व्यापार । पुढाऱ्यांचा ॥ २ ॥

तराजूचा काटा । ढळे लोकांकडे
पुढारी फाकडे । गोड बोले ॥ ३ ॥

जनहो, घ्यावे । झुकते हे माप ।
तुम्ही मायबाप । लोकसाक्षी ॥ ४ ॥

आता लोकराजे । तुम्हीच मालक ।
आम्ही हे सेवक । सर्वकाळ ॥ ५ ॥

चेहेरा मवाळ । बोलणे मधाळ ।
लोकहित माळ । गळ्यामाजी ॥ ६ ॥

मते मोजावया । बैसला पुढारी
भाव मोजी भारी । लोकांपुढे ॥ ७ ॥

एकदा का बांधी । मतांचे गाठोडे ।
परतोनी थोडे । काय पाही ॥ ८ ॥

सरळ गाठली । पुढाऱ्याने दिल्ली ।
सत्तेची त्या किल्ली । घावली गा ॥ ९ ॥

॥ २ ॥

आपुल्यास बळे । नाही बोलवत ।
नेता कृपावंत । वाचा त्याची ॥ १ ॥

साखरेची वाणी । बोलतसे नेता ।
ऐकते जनता । मुकाट्याने ॥ २ ॥

पामर जनांनी । काय बोलायाचे ।
मत टाकायाचे । गुपचूप ॥ ३ ॥

व्यवहारा ऐशा । म्हणा लोकशाही ।
सर्व काही पाही । नेता नेता ॥ ४ ॥

॥ ३ ॥

कुंभमेळ्यागत । महान ती जत्रा
पंथ पक्ष सतरा । उमटती ॥ १ ॥

एकेकाचा फड । पडेल गावात ।
भाषणे खैरात । उदंडची ॥ २ ॥

भाळावरी टिका । गळ्यामधी माळा ।
अमाप उमाळा । मुद्रेवरी ॥ ३ ॥

प्रत्येक म्हणतो । मीच सुखकर्ता ।
मीच दुःखहर्ता । जनतेचा ॥ ४ ॥

जाहीरनाम्याची । सुटेल गुंडाळी ।
बरं का मंडळी । सावधान ॥ ५ ॥

॥ ४ ॥

अशा वेळी याद । नेत्यांना लोकांची ।
हवी ना मतांची । भिक्षांदेही ॥ १ ॥
भजनी पूजनी । आता लोक सर्व ।
लोकांचेच पर्व । आले आले ॥ २ ॥
आता मुखवटे । लेऊनी निराळे ।
लोकस्तुती गळे । मुखावाटे ॥ ३ ॥
कधी नव्हे ऐसा । जनलोकां भाव ।
रंक बने राव । गदारोळी ॥ ४ ॥
मायबाप तुम्ही । तुम्हा नमस्कार ।
घडे चमत्कार । पर्वणीत ॥ ५ ॥

॥ ५ ॥

येतसे उधाण । घोषणांना आता ।
उठता बसता । लोकशाही ॥ १ ॥
लोक-लोक जप । तप लोकदेव ।
फुटतसे पेव । पुढाऱ्यांचे ॥ २ ॥
शब्दां काय तोटा । वचनी सुकाळ ।
सदा सर्वकाळ । थापेबाजी ॥ ३ ॥
नीती अनीतीची । नुरलीसे चाड ।
सत्तेचे घबाड । फक्त हवे ॥ ४ ॥
सत्ताधीश आता । खालती येतील ।
रसाळ देतील । आश्वासने ॥ ५ ॥
कालचे उर्मट । आज होती लीन ।
भुलविती मन । दंभखोर ॥ ६ ॥

ग्रंथालय
२५४३
२५००६
काव्य
शाखा (स्थळ

## बरे झाले देवा !

न्याय– अन्यायाची बाळगावी चाड
नेत्याला नसते अशी भीडभाड
सत्य– असत्याची एकच गठडी
सत्ता एके सत्ता एकच पठडी
सत्ता आदी– मधी तशीचही अंती
सत्तेविना नाही नेत्याला विश्रांती
सत्ता मनी, ध्यानी, जागृती, स्वपनी
सत्तेविना नेता घरात विजनी
सत्ता सत्ता सत्ता तिन्हीकाळी सत्ता
नेत्याला अचूक ठावा असे पत्ता
सत्ता हे जीवन, सत्ता हाची मोक्ष
नेता सदा दक्ष, सत्तेवरी लक्ष
बरे झाले देवा नेता नाही केले
राहिलो माणूस वर्तलोही भले !

## ' त्या ' गांधीने घोटाळा केला

त्या गांधीने घोटाळा केला !
आपण पंचा नेसला नि आम्हालाही चरखा दिला.
म्हणाला, ' खादी ही अंधांची काठी
आणि गरिबांची रोटी आहे ! '
आपण झोपडीत राहिला आणि आम्हालाही
प्रार्थनेत सामील करून घेतले.
म्हणायला लावले, ' सबको सन्मती दे भगवान ! '
आपण आश्रम खोलून बसला आणि आम्हालाही
अपरिग्रह, असंग्रह, अस्तेय, अहिंसा इत्यादी
एकादश व्रते सांगितली.
आपण तुरुंगात गेला आणि आम्हालाही
स्वातंत्र्य, राष्ट्रप्रेम, देशभक्तीचे धडे दिले.
आपण सेवेत गढला आणि आम्हालाही
मानवता बंधुभाव, प्रेम, ऐक्याचे पाठ दिले.
आपल्या डेस्कावर तीन माकडे ठेवली आणि म्हणाला–
' बुरा मत सुनो ! बुरा मत देखो ! बुरा मत कहो ! '
आणि मुख्य म्हणजे त्याने आम्हाला
चक्क खरे बोलायला सांगितले !
बरं आम्ही किती बावळट !
त्याच्यावर विश्वास ठेवला
आणि त्याचे खरे मानले !
त्याला महात्मा करून टाकले
राष्ट्रपिता म्हटले.

आणि गरजलो, ' महात्मा गांधी की जय ! '
मग आपला देश स्वतंत्र झाला,
लोकशाही आली, निवडणुका आल्या, नियोजन आले...
आणि धुव्वट खळणीबाज पुढारी गावोगाव
गवता ऐसे उदंड उगवले. मातले.
' बापूजीने कहा है—' म्हणत म्हणत
नाही नाही ते करू लागले, हवे तसे वागू लागले.
भ्रष्टाचार शिष्टाचार बनला.
सत्यमेव जेवते झाले
शब्द अर्थहीन झाले
आश्वासने पायदळी पडली
निष्ठेची विष्टा झाली.
पक्षांची लक्तरे लोंबली
निर्लज्ज निगरगट्टपणा शहाजोग होऊन
मिरवू लागला.
लाचारीला ऊत आला.
नको ते सगळे झाले. फोफावले.
आम्ही गोंधळलो. गडबडलो.
बापूजीने कहा है म्हणणारे खळणीबाज हसले,
आणि हलक्या आवाजात सांगू लागले,
' राजकारण असंच असतं
त्या गांधीला काय कळतं ! '
मग सगळे लक्षात आले
की, खरं आहे.
' त्या ' गांधीनेच घोटाळा केला आहे !

## समाजपुरुषा

ऊठ ऊठ रे समाजपुरुषा
उभारून तव सहस्र बाहू
सहस्रशीर्षा, सहस्र पादा
संहारावे केतु नी राहू
सहस्र जिव्हा तुझ्या मुखातील
गर्जत उठू दे वज्र एकता
सहस्र नयनातील पेटु दे
जोतिर्मय तव तुझी अस्मिता
विश्वरूप तू विश्वातीतही
अग्निरूप तू पृथ्वीपतीही
निसर्ग अवघा सखा तुझा, तू
चैतन्याचा सकल स्रोतही
असा सनातन तू पुरुषोत्तम
सत्य शिवासह सुंदर सारे
तुझ्यात सगळे जाणुन आता
लोकप्रभू तू उघडी दारे
समाजपुरुषा तू लोकात्मा
लोकशक्ती तू प्रकट करावी
सत्ता, मत्ता, स्वार्थ नागडा
भ्रष्ट आंधळी रात्र वधावी
लोकनायका भाग्यविधाता
प्राणतत्त्व तू लोकशाहिचे
भिर्कावुन दे उदासीनता
उजळ भाळ तू भारतभूचे

## या देशाला आता

या देशाला आता
भगीरथ हवा आहे, भगीरथ !
नेते पुष्कळ झाले गावगन्ना गल्लोगल्ली
नेत्यांनीच भरली आहे म्हणे आख्खी दिल्ली !
किती एक आचार्य झाले
किती एक भगवान अवतरले
किती महर्षी सहकारात उपटले
किती राजर्षी खुर्चीस चिकटले
किती वीरश्री लढले, तळपले
किती पद्मश्री दरसाल निपजले
अनेक धर्मवीर झाले गेले
अनेक कर्मवीर आले गेले
बरेच उद्योगपती उठले
पुष्कळ तंत्रज्ञ झटले झिजले...
नाही म्हणायला, चार कोपरे थोडे भिजले
कुठे तरी का होईना, मूठभर दाणे शिजले...

पण ही कैक वर्षे—युगानुयुगे तापलेली, तहानलेली धरणी—
अशा एकाद्या बलदंड करणीकडे
डोळे लावून आहे—जीव टांगून आहे.

क्षीण आवाजात पुटपुटते आहे–
‘कोणते समर्थ हात
या उद्दाम नद्यांचे प्रपाती ओघ
थोपवतील– वळवतील ?...
कोणते अशरण बाहू
आभाळाने दिलेल्या दानाचा
प्रत्येक थेंबन् थेंब
जपतील–साठवतील ?...
कोणती मृत्युंजय मनगटे
माझी कूस भिजवतील ?...
माझी तहान शमवतील !...’
अरे, लक्षात ठेवा !
नुसत्या घोषणा–वल्गनांनी
गरिबी हटत नसते,
आणि त्यासाठी-त्यासाठी–
दणकट, प्रभावी,
प्रतापी आणि प्रतिभावान
हातांची गरज असते !
असे हात केव्हा सरसावतील ?
केव्हा दिसतील ?
फार फार पूर्वी, प्राचीन काळी
असे हात एकदा -
एकदाच पाहिले होते–
भगीरथाचे !...

## देवाची काठी

देवाच्या काठीला आवाज नसतो
नियतीचा नियम वेगळा असतो

गणंग गुंडांच्या गलबल्याने कराल गिल्ला
हैदोस धुल्ल्याने जिंकाल सत्तेचा किल्ला

शासनातले शागीर्द वेठीस बांधाल
भ्रष्ट कारकीर्द बटिक बनवाल

लाचार लाळघोट्यांच्या मैफिली रंगवाल
घोषणांच्या रोषणाईत मानव्य तुडवाल

नीती अपमानित कराल, कोपऱ्यात साराल
न्याय अन्यायाने त्रस्त–बंदिस्त कराल

दणकट मनगटाने राजदंड हिसकाल
बेलगाम टापांच्या धुळीने दिक्काल भराल

झुंडपुंड बळाने 'ब्र' देखील दडपाल
विरोधाचे बोट सहज उखडाल

पण तरीही–तरीही काही उरतेच उरते
आणि तिथे मात्र सगळेच जिरते

देवाच्या काठीला आवाज नसतो
नियतीचा नियम वेगळाच असतो !

## एक माणूस

शंभर वर्षांपूर्वीची गोष्ट :
चारचौघांप्रमाणेच
एका माणसाने जन्म घेतला,
चारचौघांसारखाच तोही–
साधारण…सामान्य…
रूप नाही, बुद्धि नाही,
शक्ति नाही, युक्ति नाही,
म्हणावंसं…काहीच नाही.

चारचौघांसारखाच तोही—
साधारण...सामान्य...
चालता चालता पडला
पडता पडता उठला
करता करता चुकला...
पण एक,
प्रत्येक उठण्याचे वेळी
प्रत्येक चुकीमधून
तोहि काही तरी शिकला
खरचटलेल्या जखमेतून
नवीन धडा घेतला.
बरे, पडणे तरी थोडे का ?
बहुत बहुत पडणे
बहुत धडे गिरवणे
गिरवता गिरवता त्याचीच गोडी जडली
त्याने आपल्या जीवनाची
प्रयोगशाळाच उघडली !
दिवस नाही–रात्र नाही
श्रमणाऱ्या चिमूटभर शरीराला
थंडीवाऱ्याची तमा नाही.
अहोरात्र एकच ध्यास
तोच त्याचा बनला श्वास.
स्वतःच झाला संशोधक
स्वतःच स्वतःचा उद्‌बोधक
स्वतःलाच परीक्षा-नलिकेत घातले

स्वतःलाच तावून सुलाखून घेतले !
सामान्याला अंकुर फुटले !
तो म्हणाला,
" सत्य हाच परमेश्वर !
स्वतंत्र भाकरीतच ईश्वर ! "
त्याने पाहिले आजूबाजूला
त्याने न्याहाळले सामान्य जगाला
पण कोठेच नव्हते सत्य
म्हणून कोठेच नव्हता ईश्वर
कोठेच नव्हते स्वातंत्र्य
कोठेच नव्हती भाकरी–मानाची.
याचे दुःख याला अपार झाले
वेदनेने हृदय व्याकूळ बनले
करुणेने डोळे डबडबून आले...
दुःखाचा आवंढा गिळून म्हणाला–
" सामान्यांच्या भाकरीसाठी मी झटेन !
सामान्यांच्या मुक्तीसाठी मी लढेन ! "...
आणि हा सामान्य माणूस
सामान्यांच्या उद्धारासाठी उभा राहिला...
चालू लागला...
चालता चालता पडला
पडता पडता उठला
करता करता चुकला...
पण एक,
प्रत्येक उठण्याचे वेळी

प्रत्येक चुकीमधून
तो काहीतरी शिकला.
अखेरपर्यंत शिकला...
याचे शिकणे कधी थांबलेच नाही...
संपलेच नाही...
पण तो सत्याचा नम्र उपासक होता
म्हणून त्याचे पडणेही
उल्केसारखे तेजस्वी ठरले !
त्याच्या चुकांनीही
हिमालयाला भूषण दिले !
आणि या पडण्या-झडण्यातूनच
चुकण्यामाकण्यातूनच
या सामान्य माणसाला
सामान्य माणसाचा शोध लागला !
यानेच खरा ‘सामान्य माणूस’ ओळखला.
यानेच सामान्य माणसाचा आक्रोश ऐकला.
त्याची भूक-त्याची भीती
त्याची ईर्षा-त्याची वेदना
त्याची आशा-त्याची स्वप्ने...
यानेच प्रथम सामान्य होऊन भोगली.
शेणामेणाच्या माणसांमधून
याने चैतन्याचे मळे पिकविले
अन्यायाच्या प्रतिकारासाठी
सामान्याला उभे केले !
सामान्य माणूस हीच या युगाची

विभूती आहे...
हे महान सत्य यालाच गवसले !
आणि त्यांच्यासाठी हाही...
त्यांचाच झाला !
एक वस्त्र कमरेला
एक घास भुकेला
एक खोपटं निवाऱ्याला
हातात कळकाची काठी–आधाराला
ओठात रामनाम–उद्धाराला
डोळ्यात करुणेचे चांदणे–भविष्य उजळायला.
प्रेमाशिवाय शस्त्र नाही
सत्याशिवाय बळ नाही.
निघाला...निघाला...निघाला...

ऊन–पावसातून
थंडी–वाऱ्यातून
काट्याकुट्यातून
ओसाड स्मशानातून
रक्तरंगीत दाहकतेतून
अनवाणी पायांनी
रामधुनीच्या लयीत...

सामान्यांनी पाहिले
त्यांनी चटकन ओळखले
अवघे पटकन म्हणाले...
"अरे, हा आमचाच आहे–आमचाच आहे

आणि आम्ही—त्याचेच आहोत...
त्याचेच आहोत..."

एकमेकांच्या खुणा
एकमेकांना पटल्या
परस्परांच्या ओळखी
परस्परांशी जडल्या
नवीन नाते उदयाला आले!
सामान्यांचे अवघे राष्ट्र म्हणाले—
"हा आमचा राष्ट्रपिता आहे
हा थोर महात्मा आहे
हा युगायुगांतून संभवणारा प्रेषित आहे
हा कोट्यवधींची अंतःकरणे
उजळणारा प्रकाश आहे
हा दीन दलित दुनियेचा
स्फूर्तिदायी दीपस्तंभ आहे!..."

असेच आणखी... असेच पुष्कळ...
कुणी काही, कुणी काही म्हणत होते
हा मात्र स्वतःला समजून होता.
तो म्हणत होता...
"मी कोणीच नाही...
मी फक्त एक सामान्य माणूस आहे.
सामान्यांच्या सुखदुःखाची,
अंतःकरणपूर्वक उस्तवारी करणारा
सत्याचा एक नम्र उपासक आहे.

मानवतेचा लहानगा सेवक आहे.
प्रार्थना हेच माझ्या आत्म्याचे अन्न आहे.
परिपूर्ण प्रेम आणि अपार श्रद्धा
हीच माझी कवच-कुंडले आहेत!"

हीच कवच-कुंडले धारण करून
तो वावरत होता.
अशांतीला हटवीत
आणि भयाला दटावीत
हा खुशाल एकटाच चालत होता.

आणि शेवटी...
शेवटी जे व्हायचे होते तेच झाले.
एका धर्म झिंगलेल्या सामान्य माणसानेच
या माणसाला हौतात्म्य दिले.

याच्या दिव्य बलिदानाने
दिपून गेलेले
थोर मोठे ज्ञाते वेत्ते
स्तिमित होऊन उद्गारले—
"महामानव असेच असतात...
असेच असतात..."

हा मात्र, आपल्या अंतकाळी धरणीवर,
कधीही न उठण्यासाठी कोसळत असता
फक्त पुटपुटला...

"हे राम! हे राम!..."

## बाबा आमटे

त्यांच्यातला, त्यांचाच नि त्यांच्यासवे हा राबतो
त्यांच्याचसाठी जन्मतो नि त्यांच्याचसाठी वाढतो !

सोसणे त्यांचेच याने आपुलेही मानिले
वेदना–दुःखास त्यांच्या आपुलेचि जाणिले
घेउनी खांद्यावरी ते निरविण्याला ठाकतो !...

हासले याला कुणी बोलले अवमानुनी
थट्टाही केली आणखी वेडावले उपहासुनी
टाकलेला पाय पुढती–पुढतीच हा झेपावतो !...

'दैन्य यांचे दुःख सारे, उठवुनी यांनाच मी
गाडुनी यांच्याच करवी, सुखवुनी जाईन मी'
–जिद्द आणि स्वप्न ऐसे घेऊनी उरि झुंजतो !...

शरण आले या व्रताला माळही पाणावले
दग्धभूमी स्निग्ध झाली भाळही न्हाणावले
हात हे धरूनीच हाती खडक खडतर फोडितो !...

नांगरूनी शेत याने पेरिली आश्वासने
प्रत्ययाची शौर्यगाथा फुलवली माती–मने
कोरिली शिल्पे श्रमांची, चरित चित्रे रेखितो !...

माणसाला माणसांच्या पंखही याने दिले
क्षितिज नवखे भोवताली गगन केले मोकळे
'आत्मकर्तृत्वात रंगा' मंत्र–शंखा फुंकितो !...

## चल, घाट–

चल, घाट उतरू या आता
बघ संध्याकाळ जहाली
ही वाट चालणे बाकी
उरी दिवेलागणी आली.

एकेक स्मृतीचा दीप
उजळतो हृदय-गाभारा.
अंधार साचतासुद्धा
शहारून वळे माघारा.

अवचित गंध परिचित
दरवळून नेती दूर
त्या चालुन आल्या मार्गी
किती खुणा, उठवी काहूर.

सुररंग पुराच्या काठी
स्पर्शाची फुलवित सृष्टी
कमळांचे मिटुनी ओठ
डोळ्यांनी करू ये गोष्टी !

## कृतज्ञ

कृतज्ञ आहे मी, माझ्या ताठ कण्याचा !
तसाच मस्त कलंदर चालत्या जिण्याचा !
पदर फाटकाच होता जन्मजात
तरी आभाळ केवढे भले माथ्यावर !
खिसा रिताच सदाचा, शिवतानाच
तरी जमीन केवढी दयाळू धूळ दुखऱ्या पायावर !
एकटा, तुसडा असा, तरी अंतर दिले नाही
झाड-पाखरांनी मला दूर लोटले नाही.
सोडले नाही कधीच, तोडले नाही कधीच
दु:ख सावलीसारखे जवळ राहिले काळोखातही
सुख आले मिचकावीत डोळे, भुललो मात्र नाही.
पाठ फिरवली कळ दाबून पोटातली, हरलो मात्र नाही.
टाळ्या, घोषणा, जयजयकार—चुकुनसुद्धा नाही.
असले यश जवळ्यास फिरकलेही नाही
जिंकलो नाही म्हणून कधी रडलोही नाही.
पराभवावर पिंक टाकून चाललो दिशा दाही !
कृतज्ञ-कृतज्ञ आहे मी ताठ कण्याचा !
तसाच मस्त कलंदर चालत्या जिण्याचा !

## अगा, ऐकले कीर्तन

अगा, ऐकले कीर्तन
संत-सज्जनांचा संग
केला व्यवहार तैसा
अमुचा लागेचिना थांग ।

पामरे म्या चघळिली
संत उच्छिष्टेही किती
वैराग्याची छाया राही
लांब मैलांची ना तगली ।

मिथ्या-माया संसारात
माशी मनाशी रुतली
काही केल्या उठेचिना
अगा, असारी गुंतली ।

इंद्रायणी, तुवा दिला
जसा कोरडा अभंग
तसा घोकून राहिलो
चक्क कोरडा अभंग !

## खार

रानारानानं झुळझुळल्या
पाट वाहतो लचकत
झाडाझाडानं सळसळल्या
खार मुरकते बिचकत

हिरवं हिरवं रानं झाडं
बघता बघता भुल्लं मनं
वाहल्या पाटाशी कुणी एक
खार तल्लीन, झाली गाणं

पानापानात हिरव्या
वारा घालतोय शीळ
कुण्या खारीला एरवाळी
होई भलतीच उतावीळ !

## घर

सगळी माणसं हिंडतात फिरतात
खातात पितात हसतात बोलतात
भांडतात तंडतात रुसतात फुगतात
अंधाराच्या कोपऱ्याला चिडीचिप बसतात
पण अंधाराचा कोपरा कोपऱ्याच्या भिंती
भिंतीमधल्या खिडक्या खिडक्यावरचं छप्पर

ज्याला माणसं म्हणतात
माझं घर... माझं घर...
तेच कसं शहाणं असतं
देवासारखं बसून राहतं !

## फ़ूल उन्हाचे

फ़ूल उन्हाचे
सकाळच्या तंद्रीत उमलले
बेत धुक्याचे
मनातल्या शांतीत वितळले !
शेत मक्याचे
सोनसळी शालूत लचकले
हेत नदीचे
चमचमत्या वाळूत मुरकले !
वाट वाकडी
चुकली होती तमात वेडी
हिरवाळीतुन
निघे जावया... जवळच वाडी !
डोंगरमाथा
कळस तुऱ्यांनी चमकत आहे
झूल जरीची
थंडीच्या शिरी झुलते आहे !
फ़ूल उन्हाचे
फुलले होते- फुलवित होते
स्वप्न गुलाबी
संध्येच्या मनी तरळत होते !

: १ :

झांकळून आल्या दिशा
हवा ओली ओली कुंद
वाटा अंधारल्या बारा
वीज कडाडते मधी
थवा पक्ष्यांचा परते
लाटेवर हिंडणाऱ्या
वाऱ्या वादळाचे दीस
कंचनीचा सरदार

ऊन विसरले राग
उठे मनातला नाग
झोंबे कंचनीला वारा
ढळे उरातील पारा
घरट्याच्या निवाऱ्यास
नौका आल्या किनाऱ्यास
मन होई कासावीस
कधी येईल घरास ?

: २ :

कोसळल्या सरी सरी
रान रान गंधभेरी
गंध पिऊन अनोखा
हुंदडती वासरेही
कुंद अंधारल्या दिशी
दूर सजण ऐकतो
अंकुरली कूस काळी
तृप्त सृजनाची कळ

ओली चिंब न्हाली माती
जोडी हिरव्याशी नाती
मोहोरते तन मन
चाटू बघती गगन !
मोर घालीतसे केका
मुक्या कंचनीच्या हाका
फुटे हुंकार बीजाला
धुंद आषाढ मासाला

: ३ :

अनावर झाले जळ      वाही ओलांडुनि तट
मिठी कंचनीच्या कटी      घाली सजणहि धीट
धुंदकारलेल्या लाटा      घेती किनारी धडका
तशा फेसाळल्या मनी      मंद मदन–झुळुका
ओढ पाण्याला या नव्या,      चाल अवखळ भारी
अंधारते अचानक      भर मध्यान्ह दुपारी
मेघ उदार वर्षती      पाणी दुथडी वाहते
गोरी कंचनी उरात      खुणा जपून ठेवते.

: ४ :

निसरडी वाट झाली      तोल सावरावा किती
हात आधाराशी हाती…      कशा सांडाव्यात रीती ?
वाट निमुळती चाले      मुरडत मुरकत
चालणाऱ्यांची कशाला      तिला पर्वा, हरकत ?
अशा वाटे जाऊ नये      बजावले मनी किती
तरी रिमझिम झडे      पंख पायांना फुटती
वाट चुकार, खट्याळ      करी चेटुक कसले
तोल सावरला तरी      राघू बनात फसले !

## स्वगते

किती किती विसरावे
काय काय आठवावे
व्याज-मुद्दल सगळे
एका विठ्ठलासी ठावे !

किती निंदिले-वंदिले
किती फाडिले—सांधिले
भल्याबुऱ्याचे गाठोडे
खांदी विठ्ठलाच्या दिले

हवे तेचि लोटियले
नको तेचि सांभाळले
पसाऱ्यात ऐशा आता
एका विठ्ठला गाठले !

कुठे बसेचिना टाका
जीर्ण जाहली पैरण
थंडी वाऱ्यात उबेला
आहे विठूचे कुरण

निसटली दूरावली
झाली ध्येयहीन वाट
शक्ति-जिद्दीने चालतो
श्रेयवंत कणा ताठ !

फार शिणलो वाहता
मत्त, उद्दाम पालखी !
कधी वाहील पालखी
शिणल्या मनाची तळखी !

अंधारात अंधाराची
काळी बाहुली मिरवी
बाहुलीच्या मनी मात्र
आस उजेडाची हिर्वी !

धर्मचक्र प्रवर्तन
त्राण दिलासा वंचका
युद्ध घोषी ऐकू येतो
यशोधरेचा हुंदका !

संपताच खळे मळे
पळूनिया गेले आप्त
अशा दिवाळखोरीत
केले विठ्ठलाने जप्त !

रानी वनी हिंडताना
होतो भन्नाट सैराट .

हाती नसताना हात
होता विठ्ठल सोबत !

दऱ्याखोऱ्या पाताळात
होते धुंदीत झोकिले
फिरे गर्तेत तशाही
होते विठ्ठले झेलिले !

भरू भरू आले डोळे
दुःख उरी काठोकाठ
भग्न विकल, परंतु
विठू असे पाठोपाठ !

उफराटे होता घर
आभाळही मौनी झाले
सुन्न शुष्क अंतरात
हात विठ्ठलाचे ओले !

पेशी पेशीत रक्ताच्या
भांग मिसळून गेली
कशी कोपऱ्यात मनी
हिर्वी तुळस रुजली !

पारिजात दाता जैसा
दान ओंजळी उदार
किती वेचू, कसे वेचू
माझा फाटका पदर !

उग्र उन्हातही कसे
स्वतः उधळून घ्यावे
रंगी रंगून फुलावे,
गुलमोहोराला ठावे !

हात मोकळे ढाकळे
रिता मीच पसरितो
जसा आलो तसा आहे
देणे विठ्ठल लागतो !

तापत्रयी तापलो मी
कुठे शीतल साऊली
पायतळी तुझ्या व्हावी
वीट देहाची राऊळी !

माझे मीच पेरियले
नवे आकाश जास्वंदी
झेपावता पंख झाले
पीस सुगंधी सुगंधी !

टाळ झाले टाळी आणि
मन मृदुंग जहाले
देह अभंग भजन
प्राण प्राणात नहाले !

जसा आला पुढे प्याला
तसा ढोशिला मुकाट

कधी चंद्र सोबतीला
कधी वाराही सुसाट !

किती सजग सावध
वाऱ्या–वादळापासून
घर, सावरिले मला
कसे घेऊ सावरून !

कसे निंदू कसे खंदू
सदा झालो शिरजोर
आता मात्र झालो आहे
मीच माझ्या घरी चोर !

मणि मणि वेचुनीया
एका सूत्रात गुंफिले
आप्तखोरांनी मिळून
मला लिलावी फुंकिले !

नाही मांडिला हिशेब
नाही केली बरी वेच
ताळेबंदी आता दिसे
लुटी मला माझा मीच !

कटू गोड कथा व्यथा
भार वाहतसे शिरी
धृतराष्ट्र मीच आणि
मीच गांधारी अंधारी !

सदा कदा प्रतिवाद
नाही साधिला संवाद
आता प्रसादाच्या वेळी
कशी मला देऊ साद !

सुखापाठी हिंडताना
पाय गेलेत थकून
थकव्याचे दु:ख मला
गेले किती शिकवून !

कसे कुठे केव्हा काय
मला कळेना वळेना
सात समुद्र झोकिले
माझी तहान भागेना !

शब्दावीण अर्थावीण
अशी कशी होती गाणी
अडाणी मी तरी माझ्या
डोळा भरून आले पाणी !

वांझ उदास करंटा
ढासळता उंबरठा
पलीकडून खुणावे
एकलव्याचा अंगठा !

किती तुडवावी वाट
किती चढायचे घाट

अशी किती आटापीट
राहो हातामध्ये हात !

घरी दारी इथे तिथे
मीच आहे माझ्याविणा
उठे बसे हसे बोले
फक्त अस्तित्वाच्या खुणा !

प्रार्थनेत गाता गळा
सूर प्राणास भिडेना
शब्द नीरस कोरडा
त्यासी संवाद घडेना !

सुख-दु:ख येते जाते
ऊन सावलीचे रावे
माझ्यासवे साऊली की
मीच साऊलीच्या सवे !

दु:ख डोंगराएवढे
वंचनेत झालो चूर
नागवलो चहूबाजू
मला लोटिले मी दूर !

कळा सोसिल्या इतुक्या
दु:ख झाले कळेनासे
साकळल्या अंतरात
वेदनेचे झाले हसे !

जेव्हा मांडला बाजार
        मीही दुकानी थाटलो
राहिलो ना मीच माझा
        तेव्हा विक्रमी गोठलो !

कुणी फिरविती पाठ
        कुणी काढितसे वर्म
कुणी हसे, जाणतसे
        मीच कर्ता, मीच कर्म !

REFBK-0025006
REFBK-0025006
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

२५४३
२५००६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्रु. मा. पहा )
५०००-३-८४

संदर्भ

